नि.फौ.ख.क्र. ७७/२०१८
(नि. ४०)

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांव– मधुसुदन गजानन सुतार मेस्त्री
वय – ५६ वर्षे, व्यवसाय – पोलीस पाटील
रा. आरवली, देवूलवाडी, ता.वेंगुर्ला. जि.सिंधुदुर्ग.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.ए.व्ही.पेडणेकर यांच्यामार्फत सुरु–**

दिनांक ०३/०४/२०१७ रोजी मी आरवली गावचा पोलीस पाटील म्हणून काम पाहत होतो. मी गेल्या २२ वर्षांपासून पोलीस पाटील म्हणून काम करतो. सन २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी यांच्याकडून श्रीदेव वेतोबा मंदिर येथे येणाऱ्या भाविकांसाठी पे ॲण्ड यूज टॉयलेट या इमारतीचे शासन निधीमधून बांधकाम करण्यात आलेले होते. यामध्ये पुरुषांसाठी दोन बाथरुम, तीन टॉयलेट, पाच मुताऱ्या तसेच, स्त्रीयांसाठी दोन बाथरुम, तीन टॉयलेट व दोन वॉशबेसीन बांधण्यात आले होते. सदर बांधकामाचा ठेका एस.एल.सावंत यांनी घेतलेला होता. ग्रामपंचायत आरवली यांनी सदर पे ॲण्ड यूज टॉयलेट इमारतीचे अपुरे बांधकाम असल्यामुळे, ती इमारत ताब्यात घेतली नव्हती.

०२. दि.१०/०७/२०१४ रोजी गणेश रघुनाथ रेगे वगैरे लोकांनी पे ॲण्ड यूज टॉयलेट या इमारतीचे बांधकाम तोडण्यासाठी अण्णा झांटये व विजय नाईक शिरोडा याचा जे.सी.बी. आणलेला होता. पे ॲण्ड यूज टॉयलेट या इमारतीजवळून आरवली गावातील देवाची जाण्या–येण्याची वाट असल्यामुळे इमारतीचे बांधकाम तोडण्यात आले. सदर इमारतीचे बांधकाम तोडतेवेळी तेथे गणेश रघुनाथ रेगे, बाबूराव अनंत आरोलकर, बाळकृष्ण गोविंद येसजी, यशवंत भिवा कांबळी, सुभाष पांडुरंग पेडणेकर, सावळराम गुंडू कुडव, सुभाष भिवा कांबळी व विजय भालचंद्र मेस्त्री हे लोक उपस्थित होते. या लोकांनी इमारतींच्या शिगा तोडून त्या डंपरमध्ये भरत होते. दोन डंपर होते. हे मी माझ्या प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आहे. सदरची इमारत तोडण्यासाठी ग्रामपंचायत अगर शासनाचा आदेश नव्हता. त्यानंतर मी सदर शासकीय इमारत तोडलेबाबत व त्याबाबत कोणती कारवाई केल्याबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रारी अर्ज केला होता. ग्रामपंचायतीने माझ्या तक्रारी अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही. त्यानंतर मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी यांना इमारत बांधकाम तोडल्याबाबत कळविले. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडीचे अधिकारी घटनास्थळी येवून पाहणी करुन गेले. फिर्यादी हे

घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी आले होते. त्यानंतर मी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे तक्रारी अर्ज केला होता. त्यांनी देखील त्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. मी सन २०१५ मध्ये लोकायुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे तक्रारी अर्ज दिला . त्यानंतर दि. १०/०२/२०१७ रोजी त्या तक्रारी अर्जावर सुनावणी झाली. त्या सुनावणीला जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी व सिंधुदुर्गचे अधिकारी हे उपस्थित होते. सदर सुनावणीमध्ये लोकायुक्त यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी व सिंधुदुर्गचे अधिकारी यांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश केले. त्याप्रमाणे दि. ०१/०४/२०१७ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडीचे उपसहाय्यक इंजिनियर श्री. हेमंत विष्णू दामोदरे यांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल केल्याचे मला समजले. पे ॲण्ड यूज टॉयलेटचे गणेश रघुनाथ रेगे वगैर ८ इसम यांनी जे.सी.बी.च्या सहाय्याने तोडकाम केलेले होते हे मी प्रत्यक्ष पाहिलेले होते. घटनेच्यावेळी मी त्या लोकांना पाहिले होते. त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपींपैकी गणेश रेगे व सुभाष कांबळी सोडून इतर सर्व आरोपी हजर आहेत. गणेश रेगे हा मयत असल्याचे आताच मला समजले.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांचेतर्फे सुरु –</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की न्यायालयात साक्षीसाठी येण्याची ही माझी पहिलीच वेळ नाही. मी आरोपी क्र. २ याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की आरवली गावातील लोकांनी माझ्याविरुध्द उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्याकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की मला उपविभागीय दंडाधिकारी, सावंतवाडी यांनी ताकीद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्याविरुध्द दाखल केलेल्या अर्जाची चौकशी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की या न्यायालयात नि.फौ.ख.क्र.२६/२०१४ (महाराष्ट्र सरकार वि .गडेकर) मध्ये माझी दि. २०/१२/२०१८ रोजी साक्ष झाली होती. (साक्षीदाराने न्यायालयाला सदर केस सोडून इतर केसेस संबंधीत प्रश्न विचारण्यात येवू नये अशी विनंती केली. सदर विनंती नाकारण्यात आली.) हे म्हणणे खरे आहे की त्या केसमध्ये श्री. गोडकर यांनी माझा उलटतपास घेतलेला होता. (आता मला नि.फौ.ख.क्र.२६/२०१४ मधील माझा उलटतपासातील परिच्छेद क्रमांक ८ दाखविण्यात आला.) मला सर्व काही आता आठवले. परिच्छेद क्रमांक ८ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. मला विस्मृती होत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या मुलीने बाललैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा (POCSO) कायद्यांतर्गत आरोपी क्र. २ च्या मुलाविरुध्द केस दाखल केली होती. सदर केसमध्ये या केसमधील साक्षीदार जयवंत राय यांची मुलगी साक्षीदार होती किंवा कसे हे मी नक्की सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. २ ने साक्षीदार जयवंत बाबूराव राय

यांच्याविरुध्द अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, १९८९ प्रमाणे केस दाखल केली असून ती मा.सत्र न्यायालय सिंधुदुर्ग येथे न्यायप्रविष्ठ आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ ने माझ्या विरुध्द या न्यायालयात मी त्याला साक्षीदार जयवंत राय यांच्या दुकानात मारहाण केल्याबाबतची केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की सदर न्यायालयात आरोपी क्र. ३ याने आरोलकर यांच्याविरुध्द दिवाणी दावा दाखल केलेला असून त्यात मी साक्षीदार आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की शासनाच्या कोणत्याही विभागाने तथाकथीत पे ॲण्ड युज टॉयलेट इमारतीच्या बांधकामाबाबत माझ्याशी पत्रव्यवहार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत आरवली यांनी सदर बांधकामाबाबत माझ्याशी पत्रव्यवहार अथवा सल्लामसलत केलेली नाही. (आता मला माझा पोलीसांनी घेतलेला जबाब दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की माझ्या जबाबात दि.१०/०७/२०१४ रोजी तथाकथीत पे ॲण्ड युज टॉयलेट इमारतीचे बांधकाम तोडण्यात आले असे स्पष्टपणे लिहिलेले नाही. दि. १०/०२/२०१७ रोजी मा. लोकायुक्त मुंबई यांच्यासमोर असलेल्या सुनावणीच्या दरम्यान मी तेथे उपस्थीत होतो हे दाखविणारा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी हेमंत दामोदरे यांनी अज्ञाताविरुध्द केस दाखल केली होती.

**(आरोपींच्या वकिलांच्या तोंडीविनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– ११/०८/२०२२

(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.